॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com


*** सुविचार ***

वाचन हे ज्ञानाच्या सागराचे द्वार आहे.







■ अहिल्यानगर ■ रविवार, दि. १५ जून २०२५ ■ वर्ष ६ वे ■ अंक ६० वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145


## SPOT NEWS

### राज्यात एसटीचे ५ विभागीय कार्यालय सुरू

● **मुंबई** – राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या निर्देशानुसार सुनियोजन व निर्णयाचे विकेंद्रीकरण करण्याच्या हेतूने कर्नाटक परिवहन महामंडळ धर्तीवर एसटी महामंडळातंर्गत ५ प्रादेशिक विभागांची निर्मिती करण्यात आली आहे. त्याची अंमलबजावणी करण्याचे परिपत्रक नुकतेच एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी काढले असून पुढील काही दिवसात एसटी महामंडळाचे हे प्रादेशिक विभाग स्वतंत्रपणे आपले कार्यालय सुरू करित आहेत. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या म्हणजे एसटी महामंडळाच्या नियोजन व पणन खाते अंतर्गत कार्यरत असलेल्या विविध संनियंत्रण समित्यांचे कार्यालय दि. ६ डिसेंबर २०१६ पासून बंद करण्यात आले होते. परंतु परिवहन मंत्री प्रताप सरनाईक हे कर्नाटक राज्याच्या दौऱ्यावर असताना त्यांनी तेथील महामंडळाच्या विकेंद्रीकरणाची संकल्पना उचलून धरली. त्यामुळे आकार व प्रशासकीय दृष्ट्या कर्नाटक महामंडळाच्या दुप्पट असणाऱ्या महाराष्ट्र एसटी महामंडळाचे देखील किमान ५ प्रादेशिक विभागात विभाजन करावे अशी संकल्पना त्यांनी मांडली.

### २२ जुलै हा दिवस शुद्ध देशी गोवंश जतन व संवर्धन दिन

● **मुंबई** –राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी देशी गायींच्या संवर्धनासाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. दरवर्षी २२ जुलै हा दिवस शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धन दिन म्हणून साजरा करण्याचे घोषित केले आहे. या निर्णयाचा अध्यादेश सरकारने निर्गमित केला आहे. यापूर्वीच देशी गायीस राज्यमाता-गोमाता म्हणून घोषित करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यात मराठवाडा विभागात देवणी, लालकंधारी. पश्चिम महाराष्ट्रामध्ये खिल्लार, उत्तर महाराष्ट्रात डांगी तर विदर्भात गवळाऊ यांसारख्या देशी गायींच्या जाती आढळतात. मात्र, कमी उत्पादनक्षमता व प्रजननक्षमतेमुळे या गायींच्या संख्येत सातत्याने घट होत चालली आहे. यामुळे त्यांचे जतन व संवर्धन करण्याची गरज निर्माण झाली आहे.

# विमान अपघाताच्या चौकशीसाठी उच्चस्तरीय समिती

## केंद्र सरकारने केली घोषणा । मृतांचा आकडा २७० वर । ९ मृतदेहांची ओळख पटली

● **नवी दिल्ली । वीरभूमी**–

अहमदाबाद येथे झालेल्या एअर इंडियाच्या विमान अपघातात २६५ जणांचा मृत्यू होता तर अनेक जण जखमी झाले होते. जखमींवर स्थानिक रुग्णालयांत उपचार सुरू होते. दरम्यान, आता मृतांचा आकडा २७० वर पोहोचला असून, आतापर्यंत ९ मृतदेहांची ओळख पटली आहे. या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी आता उच्चस्तरीय चौकशी समिती नेमण्याची घोषणा केंद्र सरकारने आज केली. या समितीचे नेतृत्व केंद्रीय गृह सचिव यांच्याकडे असणार आहे. ही समिती ३ महिन्यांत आपला अहवाल सादर करणार आहे.

विमान अपघाताच्या चौकशीसाठी नेमलेली उच्चस्तरीय समिती ही केवळ एअर इंडियाच्या एआय-१७१ विमान अपघाताचीच चौकशी करणार नाही तर भविष्यात अशा दुर्घटना घडणार नाहीत, यासाठी भारतीय विमान उड्डयन विभागाने सुरक्षेच्या दृष्टीने काय पावले टाकायला हवेत, यासंबंधीही शिफारशी करणार आहे. ही समिती देशांतर्गत विमान कंपन्यांसाठी मार्गदर्शक तत्वे



निश्चित करणार आहे. या मार्गदर्शक तत्त्वाच्या आधारे केंद्र सरकार एक लिखित आदेश जारी करेल. जेणेकरून भारतीय विमान उड्डयन विभाग अधिक सुरक्षित बनण्यास मदत होईल.

एअर इंडियाच्या विमानाने दि. १२ जून रोजी दुपारी अहमदाबाद येथील आंतरराष्ट्रीय विमानतळावरून लंडनसाठी उड्डाण घेतले होते. परंतु टेक ऑफनंतर अवघ्या काही मिनिटांतच हे विमान कोसळले. या विमानात पायलट, क्रू मेंबर्ससह २४२ प्रवासी होते. एक प्रवासी वगळता २४१ जणांचा या दुर्घटनेत मृत्यू झाला. धक्कादायक बाब म्हणजे हे विमान नागरी वस्तीत म्हणजेच बी. जे. वैद्यकीय कॉलेजच्या हॉस्टेलच्या इमारतीला धडकल्याने कँटिनमध्ये जेवण करणारे जवळपास २४ भावी डॉक्टरही दगावले. त्यामुळे मृतांचा आकडा २६५ वर गेला होता. त्यातच हॉस्टेल आणि परिसरातील अनेकजण जखमी झाल्याने त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचारादरम्यान आणखी ५ जणांचा मृत्यू झाल्याने आता मृतांचा आकडा २७० वर पोहोचला आहे.


### अनेक जण बेपत्ता

■ अहमदाबादच्या सरदार वल्लभभाई पटेल विमानतळावरून उड्डाण घेतल्यानंतर विमान बीजे मेडिकल कॉलेजच्या मेसवर कोसळले होते. बीजे मेडिकल कॉलेजच्या डीन डॉक्टर मीनाक्षी पारिख यांनी सांगितले की, या अपघातात ४ डॉक्टर आणि त्यांच्या कुटुंबातील २ सदस्यांचा मृत्यू झाला. हॉस्टेल आणि मेसमधील ६-७ लोक अद्यापही बेपत्ता आहेत. अपघातानंतर मेसचे कुक ठाकूर रवी यांची आई आणि २ वर्षांची मुलगीही सापडलेली नाही.

## नीट यूजीचा निकाल जाहीर; महाराष्ट्रातील कृषांग जोशी तिसरा

● **नवी दिल्ली । वीरभूमी**–

नॅशलन टेस्टींग एजन्सीने मेडिकलसाठीच्या घेतलेल्या नीट यूजी २०२५ चा रिझल्ट आज जाहीर केला आहे. परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांना त्यांचा निकाल एनटीएच्या वेबसाईट neet.nta.nic.in वर जाऊन पाहाता येणार आहे.



नीट युजी अंतिम आन्सर जारी केले आहेत. या वेळेच्या यादीत राजस्थान, दिल्ली आणि महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचा दबदबा आहे. राजस्थानचा महेश कुमार पहिला, मध्य प्रदेशचा उत्कर्ष अवधीया दुसरा तर महाराष्ट्रातील कृषांग जोशी याचा तिसरा क्रमांक आला आहे. सर्व टॉपर जनरल कॅटेगरीतील असून केवळ टॉपर लिस्ट टॉप १० विद्यार्थ्यांमध्ये केवल एक विद्यार्थीनीला स्थान मिळाले आहे.

नॅशनल टेस्टींग एजन्सीने नीट यूजी २०२५ चा रिझल्ट आज अधिकृतपणे जाहीर केला आहे. परीक्षेत सामील उमेदवारांना त्याचे गुण वेबसाईटवर पाहायला मिळत आहेत. एनटीएच्या वेबसाईट neet.nta.nic.in वर हे गुण पाहायला मिळत आहे. पहिल्या रँकवर राजस्थानचे महेश कुमार आले आहेत तर मध्य प्रदेशचे उत्कर्ष अवधिया दूसरे आणि महाराष्ट्रातील कृषांग जोशी तिसऱ्या स्थानावर आहेत. दिल्लीच्या अविका अग्रवाल हीने टॉप ५ मध्ये स्थान मिळवून मुलींमध्ये सर्वोच्च स्थान मिळवले आहे.

## सिल्लोडमध्ये वीज कोसळून दोन सख्ख्या भावांसह ४ शेतकऱ्यांचा मृत्यू

● **सिल्लोड । वीरभूमी**–

तालुक्यात शनिवार दि. १४ जून रोजी दुपारी विजेच्या कडकडाटासह झालेल्या मुसळधार पावसाने मोठे संकट ओढवले. वीज पडून दोन सख्ख्या भावांसह एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर चार जनावरेही दगावली. या घटनेने तालुक्यावर शोककळा पसरली आहे. मृतांच्या कुटुंबीयांना शासनाकडून योग्य ती मदत देण्याची मागणी जोर धरत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी दुपारी २ वाजेच्या सुमारास तालुक्यात विजांच्या प्रचंड कडकडाटासह जोरदार पावसाला सुरुवात झाली. याच दरम्यान, सरोळा शिवारातील गट क्रमांक २९४ मध्ये वीज कोसळून यश राजू काकडे (१४) आणि रोहित राजू काकडे(२१) या दोन सख्ख्या भावांचा जागीच मृत्यू झाला. ही घटना घडली तेव्हा ते शेतात काम करत असल्याची प्राथमिक माहिती आहे. याच सुमारास मोढा बुद्रुक शिवारातील गट क्रमांक २६६ मध्येही वीज पडून रंजना बापुराव शिंदे (वय ५०) या महिलेलाही आपले प्राण गमवावे लागले. पिंपळदरी येथील शेतकरी शिवराज सतीश गव्हाणे (वय २८ वर्षे) या तरूण शेतकऱ्याचा मृत्यू झाला. तर त्याचा भाऊ जिवन सतीश गव्हाणे वय २० वर्षे हा तरुण गंभीर जखमी झाला आहे.

या नैसर्गिक आपत्तीचा फटका केवळ मानवी जीवनालाच नाही, तर जनावरांनाही बसला. मांडणा येथील गट क्रमांक २९५ मध्ये वीज पडून ज्ञानेश्वर माणिकराव लोखंडे यांची तीन वासरे दगावली. तर अन्वी शिवारातील गट क्रमांक १३९ मध्ये नारायण सांडू बांबर्डे यांची एक म्हैस देखील वीज पडून मृत्युमुखी पडली.

## वारीसाठी जाणाऱ्या प्रत्येक दिंडीला आर्थिक अनुदान; राज्य सरकारची घोषणा

● **मुंबई । वीरभूमी**–

आषाढी वारीनिमित्त सरकार मानाच्या १० पालख्यांसोबतच ११०९ दिंड्यांना प्रति दिंडी २० हजार रुपये अनुदान देणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. सरकारने याबाबतचा शासन निर्णय जारी केला.

मागील वर्षी एकनाथ शिंदे हे राज्याचे मुख्यमंत्री होते त्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत मानाच्या १० पालख्यांसोबत वारीला येणाऱ्या प्रत्येक दिंडीला अर्थसहाय्य करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यावेळी सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाकडून प्रत्येक दिंडीला २० हजारांची मदत केली होती. मागील वर्षी प्रमाणे याही वर्षी राज्य सरकारने वारीसाठी २ कोटी २१ लाख ८० हजारांचे अनुदान मंजूर केले आहे. पंढरपूरला येणाऱ्या मानाच्या १० पालख्यांसोबतच ११०९ दिंड्यांना प्रतिदिंडी २० हजार रुपये दिले जाणार आहेत.

आषाढी वारीनिमित्त पंढरपुरात वारकऱ्यांच्या सोयीसुविधेसाठी जोरदार तयारी सुरू आहे. ६ जुलैला आषाढी वारी असून त्याआधीच अनेक संतांच्या पालख्या पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ होता. मुखी हरीनामाचा गजर आणि ग्यानबा तुकाराम जयघोष करत लाखो वारकरी पंढरीला जातात. मात्र याच वारकऱ्यांचा विसर सरकारला पडला का असा प्रश्न विचारला जात होता. मागील वर्षी पंढरपूरला जाणाऱ्या प्रत्येक दिंडीला राज्य सरकारकडून आर्थिक मदत करण्यात आली होती परंतु यंदा वारी सोहळा जवळ आला तरी मदत न मिळाल्याने वारकरी नाराज झाले होते. त्यामुळे राज्य सरकारने आषाढी वारी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांसाठी मोठा निर्णय घेतला आहे.

आषाढी पालखी सोहळ्यादरम्यान वारकऱ्यांना कोणत्याही स्वरूपाचा त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी. पालखी तळ, मुक्कामाच्या ठिकाणी तसेच संपूर्ण पालखी मार्गावर आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात असे निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहे. श्री क्षेत्र देहू व श्री क्षेत्र आळंदी पालखी सोहळा-२०२५ पूर्वतयारी आढावा बैठक अजितदादांनी घेतली. पावसाच्या पार्श्वभूमीवर विसाव्याच्या, मुक्कामाच्या ठिकाणी आवश्यक व्यवस्था करावी. दिवे घाटात पाऊस पडत असल्यास पालखी सोहळा जाण्यास अडचण येणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. घाट परिसरात पालखीचे दृश्य पाहण्यासाठी नागरिकांना प्रतिबंध करावा. डोंगराच्या बाजूने खोदाई सुरू असल्याने पावसाने दगड रस्त्यावर येऊन वारकऱ्यांना धोका होऊ उत्पन्न होऊ नये म्हणून बॅरिकेटिंग करावे अशा सूचना त्यांनी दिल्या.

### महामंडळाकडून ५ हजार २०० विशेष बसेस

■ आषाढी यात्रेच्या सोहळ्यानिमित्त विठुरायाच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक पंढरपुरात येत असतात. राज्याच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या भाविकांचा प्रवास सुरक्षित व सुखकर व्हावा यासाठी राज्य परिवहन महामंडळाकडून यात्रा काळात ५ हजार २०० विशेष बस सोडण्याचे नियोजन केले असल्याची माहिती मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.

# बच्चू कडूंचे आमरण उपोषण स्थगित

● **अमरावती । वीरभूमी**–

शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि दिव्यांगांच्या मानधनात वाढ या प्रमुख दोन मागण्या घेऊन गेल्या ६ दिवसांपासून आमरण उपोषणाला बसलेल्या माजी मंत्री आणि प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी अखेर आपलं उपोषण आज मागे घेतलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे कर्जमाफीबद्दल कधीच बोलत नव्हते. पण, आपल्या आंदोलनाने, उपोषणाने त्यांना यावर बोलायला भाग पाडले.



अजित पवार आज पुण्यातील कार्यक्रमात याबाबत बोलले, असे म्हणत बच्चू कडू यांनी सरकारने आपल्या मागण्या विचार घेतल्याचे सांगत अन्नत्याग आंदोलन मागे घेतले आहे. आपले अन्नत्याग आंदोलन आपण मागे घेत नसून पुढे ढकलत असल्याचे कडू यांनी म्हटले. दरम्यान, जर आमच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर उदय सामंतजी तुमच्या घराबाहेर आम्ही आंदोलन करू, असा इशारा बच्चू कडूंनी दिला. त्यानंतर, मंत्री उदय सामंत यांच्याकडून पाणी पिऊन कडू यांनी आपले आंदोलन मागे घेतले.

सरकारच्यावतीने मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी बच्चू कडू यांनी भेटली होती. या भेटीत सरकारने त्यांच्या मागण्यांची गंभीरतेने दखल घेतली असून मंत्रिमंडळ बैठकीत हा विषय पटलावर येईल, असे म्हटले होते. त्यानंतर, आज मंत्री उदय सामंत यांनी लेखी पत्र दिल्यानंतर बच्चू कडूंनी आपले उपोषण सोडले आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल आश्वासन दिले, तेच पत्र उदय सामंत यांनी बच्चू कडूंना दिले आहे.

प्रहार जनशक्ती संघटनेचे प्रमुख बच्चू कडू यांचे गेल्या सहा दिवसापासून अमरावतीत अन्नत्याग आंदोलन सुरु होते. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह विविध मागण्यांसाठी हे अन्नत्याग आंदोलन करण्यात आले. अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंनी बच्चू कडूंची भेट घेत अन्नत्याग आंदोलन मागे घ्यावं, अशी विनंती केली होती. मात्र बच्चू कडू आपल्या मागण्यांवर आणि उपोषणावर ठाम आहेत.

### आजचा रास्तारोको मागे

■ बच्चू कडू यांच्या आंदोलनाला समर्थन देण्यासाठी उद्या १५ जून रोजी राज्यभरात करण्यात येणारे रास्तारोको आंदोलन मागे घेण्यात आले आहे. त्यामुळे, उद्या कुणीही रास्ता रोको आंदोलन करू नये, असे आवाहनही यावेळी बच्चू कडू यांनी केली.

बावनकुळेंनी कडूंची मुख्यमंत्र्यांशीही चर्चा घडवून आणली. यावेळी कडूंच्या पत्नी नयना कडू भावनिक झाल्याचे पहायला मिळाले. त्यानंतर, आज मंत्री उदय सामंत यांच्या भेटीनंतर आंदोलन स्थगित करण्यात आले असून बच्चू कडू यांच्याकडून सरकारला २ ऑक्टोबरपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. सरकारने मागण्या मान्य न केल्यास २ ऑक्टोबरनंतर पुन्हा तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

SPOT NEWS



## महेश नागरी पतसंस्थेच्या तज्ञ संचालकांचा आ. जगताप यांच्या वतीने सत्कार

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

महेश नागरी सहकारी पतसंस्था भिंगारच्या आर्थिक विकासात महत्त्वाचे योगदान दिले आहे. अनेक होतकरु युवक व गरजूंना कर्ज पुरवठा करुन त्यांना पायावर उभे करण्याचे काम केले. उद्योजक, व्यावसायिकांना भांडवल उभारणीत आधार दिला. पतसंस्थेची विकासात्मक वाटचाल सुरु असून, पतसंस्थेच्या तज्ञ संचालकपदी नियुक्ती करण्यात आलेले डॉ. श्रीकांत गांधी आणि रतिलाल गुगळे यांचा अनुभव संस्थेला अधिक व्यावसायिक आणि धोरणात्मक दृष्टिकोन देईल, तसेच आनखी विकासात्मक दिशेने घेवून जाणारा ठरणार असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले. भिंगार येथील महेश नागरी सहकारी पतसंस्थेच्या तज्ञ संचालकपदी संस्थेचे जेष्ठ संचालक डॉ. श्रीकांत गांधी आणि संस्थापक संचालक रतिलाल गुगळे यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा आमदार जगताप यांनी सत्कार केला. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी संस्थापक चेअरमन नंदकुमार झंवर (मन्नूशेठ), संचालक मारुती पवार, राष्ट्रवादीचे माजी शहर जिल्हाध्यक्ष प्रा. माणिक विधाते, माजी नगरसेवक संजय चोपडा, राजेंद्र गांधी आदी उपस्थित होते. संस्थापक चेअरमन नंदकुमार झंवर यांनी संस्थेच्या तीन दशकामधील वाटचालीचा आढावा घेतला. त्यांनी सांगितले, महेश नागरी पतसंस्था ही आज जेव्हा आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि विश्वासार्ह संस्था म्हणून ओळखली जाते, ते यामागे संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांची, संचालकांची आणि कर्मचाऱ्यांची कठोर मेहनत आहे. पतसंस्थेने सर्वांचा विश्वास मिळवला असून, शहरातील मोठी पंतसंस्था म्हणून याकडे पाहिले जाते, असे त्यांनी सांगितले.

## करंजीत बिबट्याच्या हल्ल्यात गाईचा मृत्यू

**● पाथर्डी । वीरभूमी –**

तालुक्यातील करंजी येथील भटेवाडी येथे सामाजिक कार्यकर्ते छानराज क्षेत्रे यांची डोंगराच्या पायथ्याशी देशी गायीची गोशाळा आहे. या डोंगर परिसरात नेहमी बिबट्याचा वावर असतो. या गोशाळेमध्ये सद्यस्थितीत ६७ गाई असून मंगळवारी मध्यरात्री गोशाळेतील एका गायीवर बिबट्याने हल्ला केल्याने एका गाईचा जागीच मृत्यू झाला. मागील दोन वर्षात या गोशाळेतील १३ गायीवर बिबट्याने हल्ला करून त्यांचा बळी घेतला आहे. भटेवाडी परिसरात बिबट्याचे वास्तव्य असून वनविभागाने पिंजरा लावून बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी होत आहे. यासंदर्भात क्षेत्रे यांनी अनेक वेळा वन विभागाशी पत्रव्यवहार देखील केला. मात्र एकदाही वन विभागाने क्षेत्रे यांना नुकसान भरपाई दिलेली नाही. गाईंवर हल्ला झाल्यानंतर बिबट्याचे ठसे, इतर अनेक महत्त्वाचे पुरावे वनविभागाकडे सादर केले. मात्र वनविभागाने कायम वेळ मारून नेण्याचे काम केले. प्रत्यक्षात मात्र क्षेत्रे यांना अद्याप एकदाही मदत झालेली नाही. बिबट्याच्या हल्ल्यामुळे या गाईंची सुरक्षा धोक्यात आली आहे.

# बेलवंडी गुन्ह्यातील तीन आरोपी जेरबंद

## श्रीगोंदा पोलिसांची विशेष मोहीम यशस्वी

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

२३ मे २०२५ बेलवंडी पोलीस स्टेशन अंतर्गत दाखल गंभीर गुन्ह्यातील पाहिजे त्या तीन आरोपींना श्रीगोंदा पोलिसांनी विशेष मोहिमे दरम्यान शिताफीने जेरबंद केले आहे. या कारवाईत गुन्ह्यात वापरलेली व्हेन्यु कार जप्त करण्यात आली असून, आरोपींना पुढील कारवाईसाठी बेलवंडी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.




याबाबत अधिक माहिती अशी की दिनांक १९ मे २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास फिर्यादी प्रवीण लाला भोसले (वय २९, रा. बाभुळगाव, ता. कर्जत) हे बेलवंडी गावच्या शिवारात विहीर खोदण्याच्या कामाच्या पाहणीसाठी गेले असता, आरोपी मयूर ईश्वर भोसले व त्याच्या साथीदारांनी त्यांच्यावर हल्ला केला. आरोपींनी फिर्यादीला तू पोलिसांना खबऱ्या देतोस का? असे म्हणत डोळ्यात मिरचीची पूड टाकली, पिस्तूल डोक्याला लावून अपहरण केले आणि पाथर्डी तालुक्यातील माणिकदौंडी व भिलवाडा-जांभळी रोडवरील डोंगरात नेऊन लोखंडी रॉड व तलवारीने जीवे मारण्याच्या उद्देशाने मारहाण केली. तसेच, फिर्यादीकडील सोन्याची अंगठी, चैन व आयफोन बळजबरीने काढून घेतले आणि तुला खड्ड्यात पुरून टाकू अशी धमकी दिली. याप्रकरणी बेलवंडी पोलीस स्टेशनला दि. २३ मे २०२५ रोजी भा. दं. वि. कलम १४० (१), १८९ (२), १९१ (१), १९१ (२), १९१ (३), १९०, ११८ (१) तसेच शस्त्र अधिनियम ३/२५, ४/२५ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला (गु. र. नं. ०१७९/२०२५).

ही मोहीम पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय पोलीस अधिकारी गणेश उगले व पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीगोंदा पोलिसांनी राबवली. याबाबत गुन्हे शोध पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, सदर गुन्ह्यातील पाहिजे आरोपी श्रीगोंदा शहरातील भोळेवस्ती येथे लपले आहेत. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून आरोपी मयूर ईश्वर भोसले (वय २४), अविल ऊर्फ विशाल ईश्वर भोसले (वय २३) व ईश्वर बाजीराव भोसले (वय ५८, सर्व रा. भोळेवस्ती, श्रीगोंदा) यांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. गुन्ह्यात वापरलेली विना नंबरची व्हेन्यु कार जप्त करण्यात आली आहे.

ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश अहिरे, पोलीस उपनिरीक्षक संपत कन्हेरे, सचिन लिमकर, पोलीस नाईक संग्राम जाधव, कॉन्स्टेबल संदीप शिरसाठ, संदीप राऊत, रवींद्र जाधव, अरुण पवार, गणेश साने व चालक श्री. साळवे यांनी यशस्वीपणे पार पाडली. पुढील तपास बेलवंडी पोलीस करीत आहेत. नागरिकांनी अशा गुन्ह्यांबाबत तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन श्रीगोंदा पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांनी केले आहे.

## श्रीक्षेत्र राममाळ उंचखडक बुद्रुक येथे श्री सद्गुरु यशवंतबाबा यांच्या पुण्यतिथी सोहळ्याचे आयोजन

**● अकोले । वीरभूमी –**

सोमवार दि.१६ जून २०२५ ते सोमवार दि.२३ जून २०२५ पर्यंत प्रतिआयोध्या श्री क्षेत्र राममाळ उंचखडक बु श्रश्र, ता.अकोले, गर येथे सालाबादप्रमाणे श्री सद्गुरू यशवंतबाबा यांचा ७८ वे पुण्यतिथी सोहळ्या निमित्ताने अखंड हरीनाम सप्ताह तथा ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

अकोले शहराला अगदी हाकेच्या अंतरावर व प्रवरा नदी काठी वसलेल्या श्रीक्षेत्र राममाळ येथे नुकताच प्रभू श्रीराम मंदिराचा कलशारोहण व मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा अतिशय उत्सहात पार पडला. सोमवार दि. १६ जून २०२५ रोजी सकाळी ठीक ०९:०० वाजता मार्गदर्शक योगी केशवबाबा चौधरी, ह.भ.प. मनोहरबाबा भोर, ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर) यांच्या मार्गदर्शनाखाली घटस्थापना व धर्म ध्वजारोहण करत या सप्ताह सोहळ्यास प्रारंभ होणार आहे.

सोमवार दि.२३ जून २०२५ रोजी या सप्ताहची सांगता होणार आहे तर या दिवशी सकाळी ०८:०० ते १०:०० या वेळेत दिंडी प्रदक्षिणा व नंतर १०:०० ते १२:०० या वेळेत ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर) यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे, कीर्तनानंतर समस्त बेलदार समाजाच्यावतीने महाराष्ट्र राज्य यांचेवतीने महाप्रसादाचा कार्यक्रम होईल तदपूर्वी सालाबादप्रमाणे देण्यात येणारा श्री सद्गुरू यशवंतबाबा वारकरी जीवन गौरव पुरस्कार (मरणोत्तर) वै.ह.भ.प. नामदेव भिकाजी देशमुख महाराज यांना देण्यात येणार आहे.तरी या सप्ताह सोहळ्यासाठी जास्तीत जास्त भाविकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष दशरथराव सावंत, उपाध्यक्ष अशोकराव देशमुख, सरचिटणीस योगी केशवबाबा चौधरी, देवस्थानचे महंत विठ्ठलपंत गोंडे महाराज व सर्व विश्वस्त मंडळाने केले आहे.

## चिंचोडी श्री आनंद जैन विद्यालयाच्या प्राचार्यपदी डी. सी. फकीर यांना पदोन्नती

**● पाथर्डी । वीरभूमी–**

जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रातील गौरवशाली परंपरा लाभलेल्या व शतकोत्तर वाटचाल करणाऱ्या श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाच्या चिंचोडी येथील श्री आनंद जैन विद्यालयाच्या नूतन प्राचार्यपदी डी. सी. फकीर यांची पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली आहे. ते अगोदर पाथर्डी येथील श्री तिलोक जैन विद्यालयात पर्यवेक्षक पदावर कार्यरत होते.



शैक्षणिक क्षेत्रात प्राचार्य फकीर यांनी अतिशय उत्कृष्ट, अभ्यासु, विद्यार्थीप्रिय व कडक शिस्तीचे शिक्षक म्हणून कामगिरी बजावली असून त्याची दखल घेऊन त्यांना ही जबाबदारी देण्यात आली.

डी. सी. फकीर यांनी श्री तिलोक संस्थेत आल्यानंतर विवीध विषय व पदाची जबाबदारी समर्थपणे संभाळली. त्यांचे शिक्षण क्षेत्रात मोठे योगदान आहे. आपल्या शिक्षकी कार्यकाळात संस्था व विद्यार्थ्यांसाठी फकीर सर यांनी उल्लेखनीय कामगिरी केली.

या नियुक्तीचा पदग्रहण समारंभ प्रसंगी श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाचे चिचोंडी येथील संस्थेचे कार्यकारिणी सदस्य चुनिलालजी गुगळे यांनी त्यांचा सन्मान करत स्वागत केले व आगामी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी विद्यालयाचे माजी प्राचार्य विजयकुमार छाजेड व इतर शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी श्री छाजेड सरांनी त्यांच्याकडे पदभार सोपवला.

यानिमित्त संस्थेचे सचिव सतीश गुगळे, खजिनदार सुरेश कुचेरिया, विश्वस्त डॉ. ललित गुगळे, राजेंद्र मुथ्था, धरमचंद गुगळे कार्यकारी मंडळाचे सदस्य डॉ. अभय भंडारी, डॉ. सचिन गांधी, चांदमल देसर्डा, संपतलाल गांधी आदींनी प्राचार्य फकीर यांना भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# इसुझू मोटर्स इंडियाचे महाराष्ट्रातील सर्व्हिस सेंटरचे विस्तारीकरण

## अहिल्यानगर येथे अधिकृत सर्व्हिस सेंटर म्हणून रत्नप्रभा मोटर्सची केली नियुक्ती

**● अहिल्यानगर। वीरभूमी –**

इसुझू मोटर्स लिमिटेड, जपान या कंपनीची उपकंपनी असलेल्या इसुझू मोटर्स इंडियाने आज अहिल्यानगर येथे नवीन अधिकृत सर्व्हिस सेंटर (एएससी) सुरू करत महाराष्ट्रातील आपले सर्व्हिस नेटवर्क आणखी बळकट केले आहे.

निंबळक रोडवर सोयीस्कर ठिकाणी असलेले हे नवीन सर्व्हिस सेंटर अहिल्यानगर आणि आसपासच्या भागातील इसुझू वाहन मालकांची उच्च दर्जाच्या सेवेविषयी वाढती मागणी लक्षात घेऊन सुरू करण्यात आले आहे. ६०० चौ. मी. क्षेत्रफळात पसरलेल्या या सुविधेमध्ये अत्याधुनिक वर्कशॉप, डायग्नोस्टिक टूल्स आणि प्रशिक्षित तंत्रज्ञ उपलब्ध आहेत, जे वेगवान आणि प्रभावी सर्व्हिसची खात्री देतात.






या उद्घाटनाबाबत बोलताना इसुझू मोटर्स इंडियाचे व्यवस्थापकीय उपपसंचालक श्री. तोरू किशिमोटो म्हणाले, देशभरातील आमच्या ग्राहकांशी अधिक संपर्क राखण्यासाठी आम्ही आमचे सर्व्हिस नेटवर्क सातत्याने विस्तारत आहोत. अहिल्यानगरमधील हे नवे सर्व्हिस सेंटर ग्राहकांचे समाधान वाढवण्याची आणि वाहन मालकीचा अनुभव अधिक सुलभ करण्याची आमची वचनबद्धता दर्शवते. रत्नप्रभा मोटर्ससोबतच्या भागीदारीतून आम्ही इसुझूच्या आंतरराष्ट्रीय स्तरावर सिद्ध झालेल्या विश्वासार्हतेचा आणि दर्जाचा अनुभव ग्राहकांना नक्कीच देऊ, असा आम्हाला विश्वास आहे.

रत्नप्रभा मोटर्सचे डिलर प्रिन्सिपल श्री. सागर शिवाजीराव निंबाळकर म्हणाले, इसुझू मोटर्स इंडियासोबत भागीदारी करताना आणि त्यांच्या जागतिक स्तरावर मान्यता मिळालेली सेवा मानके अहिल्यानगरमध्ये घेऊन येताना आम्हाला अभिमान वाटतो. वाहन सेवा क्षेत्रातील दहा वर्षांहून अधिक अनुभवाच्या आधारावर आमची टीम तांत्रिक उत्कृष्टतेसह ग्राहककेंद्रित दृष्टिकोन ठेवत सुरळीत सेवा अनुभव देण्यासाठी पूर्णपणे सज्ज आहे.

अहिल्यानगरमधील नवीन इसुझू अधिकृत सर्व्हिस सेंटर हे इसुझू मोटर्स इंडियाच्या देशभरातील नेटवर्क बळकट करण्याच्या प्रवासातील आणखी एक महत्त्वाचे पाऊल ठरले आहे. वेळेवर सेवा, तांत्रिक कौशल्य आणि विश्वासार्ह ग्राहक नात्यांच्या माध्यमातून उत्तम मूल्य देण्याचा प्रयत्न करत कंपनी आपली ग्राहक टचपॉइंट्सची व्याप्ती सातत्याने वाढवत आहे.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS



## श्री तिलोक जैन विद्यालयाच्या प्राचार्यपदी अजय भंडारी यांची पदोन्नतीने नियुक्ती

**पाथर्डी । वीरभूमी –**
शहरातील शतकपूर्ती साधणाऱ्या नामांकित व प्रतिष्ठित श्री तिलोक जैन विद्यालयाच्या नूतन प्राचार्यपदी अजय भंडारी यांची पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली आहे.विद्यालयात पर्यवेक्षक पदावर कार्यरत असलेल्या भंडारी यांनी उत्कृष्ट कार्याची कामगिरी बजावली असून त्याची दखल घेऊन त्यांना ही जबाबदारी देण्यात आली. अजय भंडारी यांचे वडील स्वर्गीय बन्सीलालजी भंडारी यांनी १९८९ते १९९९ या कालखंडात याच विद्यालयाचे प्राचार्य म्हणून कार्य केले होते.त्याच परंपरेत पुढे जात अजय भंडारी यांनीही शिक्षण क्षेत्रात आपले योगदान दिले आहे. त्यांनी आपल्या सेवेला माणिकदौंडी येथील रत्न जैन विद्यालयातून सुरुवात केली आणि नंतर श्री तिलोक जैन विद्यालयात सहशिक्षक व पर्यवेक्षक म्हणून उल्लेखनीय कामगिरी केली. या नियुक्तीचा पदग्रहण समारंभ श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाचे सचिव सतीश गुगळे, खजिनदार सुरेश कुचेरिया, विश्वस्त डॉ.ललित गुगळे, राजेंद्र मुथ्या, कार्यकारी मंडळाचे सदस्य डॉ.अभय भंडारी, डॉ.सचिन गांधी, चांदमल देसर्डा तसेच सर्व शिक्षक यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या प्रसंगी संस्थेचे सचिव सतीश गुगळे यांनी प्राचार्य भंडारी यांना भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनील कटारिया यांनी तर आभार प्राचार्य अजय भंडारी यांनी मानले.

## रामवाडीत ड्रेनेज लाईन कामाचा शुभारंभ

**अहिल्यानगर । प्रतिनिधी–**
शहरातील रामवाडी परिसरातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला ड्रेनेज लाईनचा गंभीर प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. आमदार संग्राम जगताप यांच्या विशेष प्रयत्नातून या कामासाठी ७० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रा. माणिक विधाते यांच्या हस्ते या कामाचा शुभारंभ करण्यात आला. या कामामुळे रामवाडी परिसरातील नागरिकांना पावसाळ्यातील सांडपाणी वाहतुकीच्या त्रासातून कायमची मुक्ती मिळणार असून, परिसराच्या स्वच्छतेस व आरोग्यास मोठा हातभार लागणार आहे. या कामासाठी रामवाडी नागरी सुविधा समितीच्या माध्यमातून समितीचे अध्यक्ष प्रकाश वाघमारे यांनी जगताप यांच्याकडे पाठपुरावा केला होता. या उद्घाटनाप्रसंगी भूपेंद्र परदेशी, अनिता भोसले, रामवाडी नागरी सुविधा समितीचे अध्यक्ष प्रकाश वाघमारे, पप्पू पाटील, दीपक सरोदे, सतिश साळवे, सुरेश वैरागर, सचिन जाधव, सागर जाधव, आकाश मनोचा, रोहित मिश्रा, बाळूमामा माने, दीपक साबळे, दीपक लोखंडे, बंटी साबळे, पप्पू पाथरे, मयूर चखाले, गणेश ससाने, अजय केजरलं, राजू कांबळे आदींसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. माणिक विधाते म्हणाले की, रामवाडी झोपडपट्टीसारख्या दुर्लक्षित भागात आमदार संग्राम जगताप यांनी मोठ्या प्रमाणावर विकासकामे हाती घेतली आहेत. पथदिवे लावून अंधार दूर केला, रस्ते सुधारले, आता ड्रेनेज समस्या सोडवून नागरिकांना मूलभूत सुविधा मिळवून दिल्या. हा खऱ्या लोकप्रतिनिधीचा विकासदृष्टीकोन असल्याचे त्यांनी सांगितले.

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर प्रहार दिव्यांग संघटनेचे लक्षवेधी आंदोलन



**नगर । वीरभूमी–**
बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाला पाठिंबा म्हणून प्रहार अपंग क्रांती संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्षवेधी आंदोलन करण्यात आले यावेळी प्रहार अपंग क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष ॲड. लक्ष्मण पोकळे समवेत विनोद परदेशी, मधुकर घाडगे, लक्ष्मीताई देशमुख, हमीद शेख, संदीप शेंडकर, शिकारे सर, राजेंद्र पोकळे, सिराज शेख, बंडू लबडे, ज्ञानदेव कोळ, नितीन भन्साळी, रोहिणी करंडे, योगेश लबडे, सलीमभाई शेख, दादासाहेब शेजुळ, अशोक खेडकर, अरविंद नरसाळे, कांता सरडे, कमल सरोदे आदीसह अपंग बांधव व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, शेतकरी कष्टकरी कामगार दिव्यांग महिला व अन्य वंचित घटकांच्या न्याय हक्कासाठी बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली ८ जून २०२५ पासून बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू आहे परंतु शासनाने राष्ट्र मागण्यांबाबत अद्याप पर्यंत कुठलीही दखल न घेतल्याने प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्या वतीने पाठिंबा दर्शन लक्षवेधी आंदोलन सुरू करण्यात आले या आंदोलनाला बळ देण्यासाठी व शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलनाला सुरुवात करण्यात आली आहे.

यामध्ये प्रमुख मागण्या दिव्यांग बांधवांना सहा हजार रुपये पेन्शन मिळाली पाहिजे व शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी झाली पाहिजे मेंढपाल व मच्छीमार यांच्यासाठी स्वतंत्र धोरण तयार करून त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे तसेच शेतकऱ्यांच्या पिकास हमीभाव दिले पाहिजे अशा विविध मागण्यांसाठी लक्षवेधी आंदोलन सुरू करण्यात आले आहे.

## वादळी पावसाने झाड पडल्याने केडगाव स्मशानभूमीचे नुकसान

**अ. नगर । प्रतिनिधी–**
शहरात नुकतेच झालेल्या जोरदार वादळी वाऱ्यासह पाऊसाने मोठे नुकसान झाले आहे. या वादळी पावसाने केडगाव येथील स्मशानभूमीच्या शेडवर निलगिरीचे झाड कोसळल्याने शेडचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे व माजी नगरसेवक मनोज कोतकर यांनी स्मशानभूमीत झालेल्या नुकसानीची पहाणी केली. यावेळी इंजि. निंबाळकर, सुमित लोंढे, शरद ठुबे, सुनील तात्या सातपुते, युवा नेते सुजय मोहिते, सोन्याबापू घेंबूड, सूरज कोतकर, अक्षय कोतकर, ज्येष्ठ समाजसेवक नंदू पालवे यांच्यासह केडगावचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वादळी पावसात केडगावच्या स्मशानभूमीत झाड पडल्याची माहिती मिळताच कोतकर यांनी घटना स्थळाची पाहणी करुन आयुक्त डांगे यांना कल्पना दिली.

आयुक्तांनीही परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ घटनास्थळी भेट देऊन कर्मचाऱ्यांना कोसळलेले झाड हटवण्याचे आदेश दिले. पडलेले झाड हटविण्यात आले असून, या झाडमुळे स्मशानभूमीच्या शेडचे पूर्णत: नुकसान झाले आहे. आयुक्त डांगे यांनी कोसळलेल्या शेडचे लवकरात लवकर नव्याने काम करून देण्याचे आश्वासन दिले.

मनोज कोतकर यांनी आयुक्तांचे आभार मानले व मागील पावसात पुराने वाहून गेलेल्या स्मशानभूमीच्या भिंतीचे काम सुरु असून, स्मशानभूमीतील इतर आवश्यक कामे देखील लवकरच हाती घेण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. ग्रामस्थांनी देखील मदतीला लोकप्रतिनिधी व मनपा प्रशासन धावून आल्याने त्यांचे आभार व्यक्त केले.



## साने गुरुजी यांना स्मृतिदिनानिमित्त त्यांची गीते गाऊन केले अभिवादन

**अकोले । प्रतिनिधी–**
देशभक्तीपर गीतांपासून बालगीतांपर्यंत पुज्य सानेगुरुजींनी लिहिलेली विविध गीते सादर करीत साने गुरुजींच्या आठवणी जागवल्या गेल्या. त्यांच्या कार्यकृत्त्वाचे ओझरते दर्शन उपस्थिताना घडविले गेले. ही गीते ऐकताना कधी अंगावर रोमांच उभे राहिले तर कधी स्फूर्ती निर्माण केली.

साने गुरुजींच्या स्मृतिदिनानिमित्त बलसागर भारत होवो हा गुरुजींच्या गीतांचा संगीत आविष्कार असणारा कार्यक्रम राष्ट्रसेवा दलाच्या अकोले शाखेने आयोजित केला होता. शाहीर प्रा. तुळशीराम जाधव यांनी आपल्या पहाडी आवाजात गीते सादर केली. खरा तो एकाची धर्म या प्रसिद्ध प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरवात झाली. या पहिल्याच गीताने उपस्थितांना मधील ज्येष्ठांच्या शालेय जीवनाच्या आठवणी जग्या झाल्या. पूर्वी अनेक शाळांची सुरवात या प्रार्थनेने होत असे.

बालगीत, स्फूर्ती गीत, चळवळीचे गीत अशी विविध प्रकारची गाणी जाधव यांनी सादर केली. मातृ हृदयी असणारे साने गुरुजी प्रसंगी व्रज मुठ आवळून संघर्षला सिद्ध होत असे सांगत त्यांनी आता उठवू सारे रान, आता पेटवू सारे रान' हे गाणे खड्या सुरात म्हणायला सुरवात केली तेव्हा उपस्थित असणारे सामुदायिक कोरस देत त्यात सहभागी झाले. कवी इंद्रजीत भालेराव यांचे प्रसिद्ध शेतकरी गीत ही सादर केले. बलसागर भारत होवो या गीताने कार्यक्रमाची सांगता झाली. गीते सादर करीत असताना प्रा.जाधव यांनी साने गुरुजींच्या व्यक्तिमत्वाचे पैलूही उलगडून दाखविले.भजना सारखी चळवळीची गाणीही समाजा पर्यंत पोहचायला पाहिजे असे ते म्हणाले. निवडक जाणकार श्रोत्यांच्या उपस्थितीत झालेला हा कार्यक्रम दीर्घ काळ लक्षात राहील असाच होता.

तुळशीराम जाधव यांना गणेश बिडवे यांनी तबला मंगेश बिडवे यांनी हार्मोनियम व प्रथमेश बिडवे यांनी ढोलकीची तसेच विशाल वाघमारे

तृप्ती जोर्वेकर स्वराली ढमाले अक्षरा ढमाले यांनी साथ दिली. राष्ट्र सेवा दलाचे विनय सावंत व त्यांच्या सहकार्यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

## ब्राझील अभ्यास दौऱ्यासाठी राजेंद्र नागवडे यांचा सत्कार



**श्रीगोंदा । वीरभूमी–**
सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे हे राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ, नवी दिल्ली यांच्या वतीने आयोजित ब्राझील अभ्यास दौऱ्यात सहभागी होत आहेत. हा दौरा १५ ते २३ जून या कालावधीत होणार असून, त्यानिमित्ताने कारखान्याच्या कार्यस्थळावर संचालक मंडळातर्फे त्यांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.

राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष व माजी सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या दौऱ्यात ब्राझीलमधील साखर उद्योगाचा अभ्यास केला जाणार आहे. या दौऱ्यात राजेंद्र नागवडे यांच्यासह हरियाणाचे सहकारमंत्री अरविंद कुमार शर्मा, माजी मंत्री राजेश टोपे, आमदार विश्वजीत कदम, राहुल आवाडे, कल्याणराव काळे, प्रमोद जाधव, अभिजीत पाटील, फेडरेशनचे कार्यकारी संचालक प्रकाश नाईक नवरे, हरियाणाचे कॅप्टन शक्ती सिंग यांच्यासह देशातील नामवंत साखर कारखान्यांचे प्रतिनिधी सहभागी होत आहेत.

कारखान्याचे व्हा. चेअरमन बाबासाहेब भोस यांच्या हस्ते राजेंद्र नागवडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सर्व संचालक मंडळ सदस्य आणि कार्यकारी संचालक प्रवीण शिंदे उपस्थित होते. या दौऱ्यामुळे ऊस शेती आणि साखर उद्योगाचा सखोल अभ्यास करण्याची संधी मिळेल, ज्याचा भविष्यात कारखान्याला आणि शेतकऱ्यांना फायदा होईल, असे राजेंद्र नागवडे यांनी सत्कारप्रसंगी सांगितले.

स्व. शिवाजीराव नागवडे यांच्या प्रेरणेतून कारखाना ऊस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य न्याय देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे, असेही त्यांनी नमूद केले.

# काळे कारखान्याच्या वतीने ऊस पीक परिसंवाद व चर्चासत्र उत्साहात

**कोपरगाव । वीरभूमी –**
कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या सभासद व ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी कारखान्याचे मार्गदर्शक व ज्येष्ठ संचालक मा.आ. अशोकराव काळे व कारखान्याचे चेअरमन आ. आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली कारखाना कार्यक्षेत्रातील कोपरगाव तालुक्यातील वडगाव–बक्तरपूर येथे आडसाली ऊस पिक व कीड नियंत्रणा बाबत परिसंवाद व चर्चा सत्र शनिवार (दि.१४) रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाले. अध्यक्षपदी कारखान्याचे व्हा.चेअरमन शंकरराव चव्हाण होते.

कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या दैनंदिन गाळप क्षमतेत वाढ झाल्यामुळे ऊस उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने कारखाना संचालक मंडळाने कारखाना कार्यक्षेत्राच्या प्रत्येक गटात ऊस मेळावे व चर्चा सत्र घेण्याचे वार्षिक नियोजन केले आहे. त्यानुसार वडगाव बक्तरपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या आडसाली ऊस पिक व कीड नियंत्रणा बाबत परिसंवाद व चर्चा सत्रात वसंतदादा शुगर इंस्टीट्युटचे ऊस उत्पादन व संरक्षक विभागाचे प्रमुख संशोधक डॉ.अशोक कडलग व रोग शास्त्र विभागाचे प्रमुख संशोधक डॉ. गणेश कोटगिरे यांनी उपस्थित ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी डॉ. अशोक कडलग यांनी ऊस पिकाच्या पाणी व खत व्यवस्थापनाबद्दल माहिती देतांना सांगितले की, ऊस पिकाची लागवड करतांना शेतकऱ्यांनी योग्य जमिनीची निवड करून सेंद्रिय कर्ब वाढवावे. खतांचा संतुलित वापर करावा.क्षारयुक्त जमिनीची सुधारणा करून पाण्याचा कमीत कमी वापर करून जास्तीत जास्त ऊस उत्पादन घ्यावे. त्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात ए.आय चे देखील मार्गदर्शन घ्यावे असा सल्ला दिला.

ऊस पिकाच्या रोग नियंत्रणा बाबत मार्गदर्शन करतांना डॉ.गणेश कोटगिरे यांनी सांगितले की,पावसाळा सुरु झाला असून भविष्यात ऊस पिकावर ह्युमनी किडीचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यासाठी संध्याकाळच्या वेळी ह्युमनीचे भुंगे जमा करून नष्ट करावे जेणेकरून ऊस पिकावर होणाऱ्या ह्युमनी किडीचा प्रादुर्भाव रोखणे सहज शक्य होते. तसेच विविध किडीचे व रोगांचे एकात्मिक नियत्रण करण्यासाठी उपस्थित ऊस उत्पादक शेतकऱ्यांना सखोल मार्गदर्शन केले.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक कारखान्याचे प्र.कार्यकारी संचालक सुनील कोल्हे म्हणाले की, चालू वर्षी मे महिन्यापासूनच वरून राजाने कृपा केली असून कारखाना कार्यक्षेत्रात देखील चांगल्या प्रकारचे पर्जन्यमान होत आहे. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आडसाली ऊसाचे उत्पन्न घ्यावे. आडसाली ऊसाच्या लागवडीतून एकरी ६० ते ७० टन उत्पन्न मिळते व आडसाली ऊस कारखान्याचा गळीत हंगाम सुरु होताच तोडला जातो. त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी आडसाली ऊसाच्या लागवडी कराव्या असे आवाहन केले.

या ऊस पिक परिसंवादासाठी कारखान्याचे व्हा.चेअरमन शंकरराव चव्हाण, संचालक श्रीराम राजेभोसले, सचिन चांदगुडे, सुनील मांजरे, माजी संचालक कचरू घुमरे, कारखान्याचे प्र.कार्यकारी संचालक सुनील कोल्हे, शेतकी अधिकारी निळकंठ शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कारखान्याचे प्र. कार्यकारी संचालक सुनील कोल्हे यांनी केले. सूत्रसंचालन आण्णासाहेब चीने यांनी केले तर आभार शेतकी अधिकारी निळकंठ शिंदे यांनी मानले.यावेळी मोठ्या संख्येने सभासद व ऊस उत्पादक शेतकरी उपस्थित होते. ऊस पिक परिसंवाद कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या ऊस विकास व शेतकी विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# माणसाला माणूस म्हणून जोडणारा पूल कम्युनिस्ट बांधत आहे

## कॉ. डॉ. राम बाहेती | भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या त्रैवार्षिक जिल्हा अधिवेशनात कर्जमाफीसह विविध ठराव

**अहिल्यानगर | वीरभूमी –** माणसे एकत्र राहून सत्तेविरोधात बंड करू नये, यासाठी सत्ताधारी भाजप सरकार जाती-धर्माच्या भिंती निर्माण करत आहे. मात्र श्रमिक, माणसाला माणूस म्हणून जोडणारा पूल बांधण्याचे काम कम्युनिस्ट करत आहे. जाती-जातीत व धर्मा-धर्मात भांडणे लावून एकमेकांना तोडण्याचे काम सुरु असून, जनतेला श्रमिक, कष्टकरी या एका झेंड्याखाली आणण्याचे कार्य लाल बावट्याची चळवळ करत आहे. जाती-धर्माच्या भिंती उभ्या राहत नाही, तोपर्यंत त्यांचे राजकारण पुढे जाणार नाही. सर्वसामान्यांनी हे राजकारण समजावून घेऊन माणसाला माणसांशी जोडणारा पूल मजबूत करण्याचे आवाहन भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सहसचिव कॉ. डॉ. राम बाहेती यांनी केले.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे त्रैवार्षिक जिल्हा अधिवेशन शहरातील कोहिनूर मंगल कार्यालयात उत्साहात पार पडले. यावेळी बाहेती बोलत होते. यावेळी भाकपचे राज्य सचिव कॉ. ॲड. सुभाष लांडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या अधिवेशाप्रसंगी भारतीय महिला फेडरेशनच्या राज्य अध्यक्ष कॉ.स्मिता पानसरे, आप्पासाहेब वाबळे, कॉ. बाबा आरगडे, कॉ. बबनराव सालके, जिल्हा सचिव कॉ. ॲड. बन्सी सातपुते, जिल्हा सहसचिव कॉ. सुधीर टोकेकर, संतोष खोडदे, कॉ. भारती न्यालपेल्ली, ज्ञानेश्वर सहाणे, कॉ. महेबुब सय्यद, कॉ. अनंत लोखंडे, अशोक सब्बन, कॉ. कारभारी उगले, कॉ. भगवान गायकवाड, ॲड. ज्ञानदेव सहाणे, कॉ. सुभाष ठुबे आदींसह व पदाधिकारी व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून २५० प्रतिनीधी सहभागी झाले होते.

पुढे बाहेती म्हणाले की, सत्ताधारी भाजप एक नंबरचा शत्रुपक्ष म्हणून कम्युनिस्ट व लालबावटाकडे पाहत आहे. तत्त्वांशी तडजोड न करणारे कॉम्रेड त्यांच्या गळाला लागत नाही. त्यांना कसेही वळवता येत नाही यासाठी त्यांच्यासाठी कम्युनिस्ट शत्रू ठरत आहे. देशातील कामगार, कष्टकरी, शेतकरी सर्व समाज घटक त्रस्त आहेत. त्यांच्या प्रश्नांकडे लक्ष देण्याऐवजी जाती-धर्मावरून राजकारण केले जात आहे. जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन सर्वसामान्य, श्रमिकांचे प्रश्न सोडविण्याचे काम कम्युनिस्ट पक्ष करत आहे. कम्युनिस्ट यांनी आजपर्यंत केलेल्या अनेक आंदोलनातून सर्वात जास्त लाभ हिंदू समाजाला झाला, मात्र कम्युनिस्टांनी कधीही हिंदुत्वाचे नाव पुढे केले नाही. गोरगरिबांच्या नावाने आपला संघर्ष सुरु ठेवला. संविधान बदलून हिंदू राष्ट्राचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी ४०० पार च्या घोषणा लोकसभेच्या निवडणुकीत देण्यात आल्या असल्याचा आरोप त्यांनी केला.

१९७८ साली व नंतर पुन्हा संघर्ष करून १९९१ पर्यंतचे सर्व अतिक्रमणे नियमाकुल करण्याचा शासन निर्णय सरकारला काढावा लागला. कम्युनिस्टांनी लढले तर मिळते! हे दाखवून दिले. २०२५ पर्यंतचे सर्व अतिक्रमणे नियमित करा, ही कम्युनिस्ट पक्षाची मागणी आहे. शेतकरी, शेतमजूर यांचे प्रश्न तीव्र झाले आहे. महिलांवरील अत्याचार वाढले. अल्पसंख्यांक, दलित समाजाला टार्गेट केले जात आहे. त्यांचे उदरनिर्वाहाचे साधन हिसकावले जात आहे. भांडवलदारांच्या शाळा चालण्यासाठी सरकारी शाळा बंद पाडण्याचे षडयंत्र सुरू आहे. सर्वसामान्यांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे कारस्थान आहे. या सर्व घटकांवर होणाऱ्या हल्लेच्या विरोधात भारतीय कम्युनिस्ट पक्ष निर्भीडपणे आवाज उठवत असल्याचेही बाहेती म्हणाले. तर जनता सुरक्षा विधेयक ब्रिटिश सरकारची पुनरावृत्ती असून, ज्याला भगतसिंग यांनी विरोध केला होता. तो कायदा सरकार विरोधात असलेल्या आंदोलन, चळवळीला दडपण्याचे काम करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अधिवेशनाच्या प्रारंभी पक्षाचा लाल ध्वज फडकावून त्याला सलामी देण्यात आली. या अधिवेशनात शेतकऱ्यांना सरसकट कर्ज माफी द्यावी, नवीन कामगार संहिता रद्द करावा, शेतीमालाला किमान आधारभूत किंमत मिळण्यासाठी कायदा करावा, अल्पसंख्यांक समाजावर उघडपणे सुरु




असलेली दहशतीला पायबंद घालावा, मॉबलिंचिगच्या प्रकरणात आरोपींना कठोर शिक्षा मिळावी, या मागण्या संदर्भात ठराव घेण्यात आला. लाल बावटे की जय..., लाल झेंडे की जय... लाल सलाम! च्या घोषणांनी सभागृह दणणाले.

प्रास्ताविकात बन्सी सातपुते यांनी सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर रस्त्यावरची लढाई कम्युनिस्ट पक्ष करत आहे. मागील तीन वर्षात कोठे होते व पुढील तीन वर्षात कुठे मार्गक्रमण करायचे? याचा आढावा व नियोजन वैचारिक पक्ष परिषदेत होत असल्याचे त्यांनी सांगितले. अशोक सब्बन यांनी शेतकरी संरक्षण कायदा आणावा व परदेशात शेतकरी यांना विविध कायद्याच्या माध्यमातून देण्यात आलेल्या संरक्षणाची माहिती दिली.

कॉ. ॲड. सुभाष लांडे म्हणाले की, सत्ताधारी स्वतःचे हित साधण्यासाठी जाती-जाती व धर्मावरून झुंजवण्याचे काम करत आहे. निवडणुकीत दिलेल्या आश्वासन पूर्ण करण्याऐवजी जाती-धर्माचे मुद्दे उपस्थित करुन प्रमुख प्रश्नांना बगल दिली जात आहे. जन सुरक्षा विधेयक हे अर्बन नक्षलच्या नावाखाली चळवळी दडपण्याचे षडयंत्र असल्याचे त्यांनी सांगितले. कॉ. अनंत लोखंडे यांनी जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन पोटाचे प्रश्न मांडावे लागतील, तेव्हा या धर्मांध शक्तीचे पतन होणार असल्याचे सांगितले. कॉ. महेबुब सय्यद यांनी कम्युनिस्ट यांनी स्वातंत्र्य लढ्यात देशासाठी मोठे बलिदान दिले. आज सत्ताधारी देश प्रेमाचा खोटा बुरखा पांघरला आहे. सर्व माणसांचे रक्त लाल असते, त्याला कोणताही भगवा, हिरवा, निळा रंग नसतो, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शर्मिला गोसावी यांनी केले. आभार संतोष खोडदे यांनी मानले.

# उद्योजक बापू माने यांचा शिवसेना तालुका प्रमुखावर गंभीर आरोप

## खऱ्या वारसदारांना न्याय मिळवणार | बाजारतळ राम मंदिर वाद

**श्रीगोंदा | वीरभूमी –** श्रीगोंदा येथील उद्योजक बापू ाने यांनी पत्रकार परिषदेत शिवसेना ालुका प्रमुख नंदकुमार ताडे यांच्यावर भीर आरोप केले आहेत. यावेळी ी. माने यांनी सांगितले की, त्यांनी ऱ्या वारसदारांकडून कायदेशीरपणे ागा खरेदी केली असून, श्रीराम दिराची जागा घेतलेली नाही. मात्र, ाडे यांच्या बेकायदा कृत्यांचे पितळ घडे पडण्याच्या भीतीने त्यांनी पमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ावाचा गैरवापर करत स्थानिक शासनावर दबाव टाकून माने ांच्यावर मंदिराची जागा घेतल्याचा ोटा आरोप लावला आहे.

पुढे बोलताना श्री. माने म्हणाले ो, ताडे यांनी राजकीय वरदहस्ताने ्रे वारसदार चंद्रनंदन ताडे यांना ाजूला सारून बनावट प्रतिज्ञा प्रत ादर केल्याचा दावाही माने यांनी ेला.माने म्हणाले, ताडे यांनी ्का प्रतिज्ञा पत्रात स्वतःला चुलत



बहिणीचा वारस म्हणून मालमत्तेत नाव असल्याचे म्हटले, तर दुसऱ्या प्रतिज्ञा पत्रात त्या चुलत बहिणीच्या वडिलांचे लग्नच झाले नव्हते, असे सांगितले. ही परस्पर विरोधी प्रतिज्ञा पत्रे ताडे यांच्यासाठी अडचणीची ठरू शकतात. म्हणूनच त्यांनी शिवसेनेच्या पदाचा गैरवापर करत आमच्यावर तडीपार आणि मोक्का लावण्याची धमकी दिली आहे. पण राज्य सरकार कायद्याने चालते, हे ताडे विसरले असले तरी आम्ही कायदेशीर मार्गाने लढा देऊ. खरे वारसदार चंद्रनंदन ताडे आणि त्यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही कोर्टात दाद मागणार आहोत.

माने यांनी ताडे यांना आव्हान देताना म्हटले, मुंबईत धावपळ करून तडीपार किंवा मोक्का लावण्यासाठी दबाव टाकण्याऐवजी पोलिस ठाणे आणि तहसील कार्यालयात कागदपत्रे घेऊन या. मग खरे गुन्हेगार कोण, हे समजेल. त्यांनी पुढे इशारा दिला की, जर या प्रकरणात त्यांच्यावर अन्याय झाला, तर ते मुंबईतील आझाद मैदानावर उपोषण करून सर्व कागदपत्रे शासनासमोर मांडतील. यावेळी चंद्रनंदन ताडे आणि त्यांच्या कुटुंबीयांनी ६० वर्षांपूर्वीचे वाटप पत्र आणि मूळ वंशजांची माहिती सादर करत ताडे यांनी राजकीय दबावातून त्यांना सातत्याने बाजूला ठेवल्याचा आरोप केला. त्यांनीही कायदेशीर मार्गाने लढा देण्याची घोषणा केली.

यावेळी बापू माने यांनी स्पष्ट केले की, ते रामभक्त असून, श्रीराम मंदिराच्या उभारणीत त्यांनी मदत केली आहे. ते म्हणाले, मंदिराच्या जागेला कोणताही अडथळा नाही. आम्ही आमच्या जागेत हनुमान मंदिर उभारणार आहोत. खऱ्या वारसदारांना न्याय मिळवून देऊन बोगस प्रत प्रतिज्ञा पत्रे सादर करणाऱ्यांचा खरा चेहरा जगासमोर आणू व श्री. माने यांनी प्रशासनावरही प्रश्न उपस्थित केले. ते म्हणाले, ताडे यांनी सादर केलेली परस्पर विरोधी प्रतिज्ञा पत्रे आणि बेकायदा कृत्यांकडे प्रशासन डोळेझाक करत आहे. पण आम्ही कायदेशीर लढा देऊन सत्य बाहेर काढू. या प्रकरणाने श्रीगोंद्यातील राजकीय आणि सामाजिक वातावरण तापले असून, पुढील कायदेशीर कारवायांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# उच्च कोटीच्या संतांच्या भेटीमुळे प्रारब्ध संचित बदलते : हभप. विश्वनाथ गिरी महाराज

**कोपरगाव | प्रतिनिधी–** कितीही ऐहिक संपत्ती मिळाली तरी अखेरीस सर्वांना एक दिवस काळाच्या पडद्याआड जावंच लागतं. परंतु जीवनात उच्च कोटीच्या महात्मे, संतांची भेट झाली तर प्रारब्ध संचित बदलले जाते असे प्रतिपादन ह.भ.प. विश्वनाथ गिरी महाराज यांनी यांनी कान्हेगाव केले आहे.

नको नको मना गुंतू मायाजाळीं । काळ आला जवळी ग्रासावया संत तुकाराम महाराज या अभंगातून आपल्या मनाला उद्देशून उपदेश करत आहेत की, हे मना, या भ्रामक आणि क्षणिक मोहाच्या जाळ्यात गुंतू नकोस. मृत्यू तुझ्या अगदी जवळ आहे. आपल्या आजूबाजूचे लोक भाऊ, वडील, आजोबा आधीच मृत्यूला सामोरे गेले आहेत, पण तरीही आपण सावध होत नाही. मोहाची संगत करून अंतःकरण फसवत राहतो.



आता तरी पांडुरंगाचे नामस्मरण कर कारण शेवट जवळ आलाय. मृत्यूची झेप जेव्हा पडेल, तेव्हा मायबाप, राजा असो, देशाचा प्रमुख असो, किंवा अगदी आपले अत्यंत जवळचे नातेवाईक असोत, कोणीही आपली सोडवणूक करू शकणार नाही.

कर्म करणारे आपले हात, पाय, डोळे, इंद्रिय आहेत. तरीही तुकाराम महाराज आपल्या मनाला उपदेश करतात. हवेपेक्षाही मनाचा वेग जास्त आहे आणि म्हणून कर्म करणारे मन आहे. भगवान श्रीकृष्णालाही हे जगत सोडून जावे लागले. अवतार कार्य संपले की प्रत्येकाला जावेच लागते.

सद्गुरु गुरुवर्य नारायणगिरीजी महाराज स्थूल स्वरूपाने आपल्यात नसले तरी त्यांचे व्यापक कार्य आज सुरूच आहे. ते सदैव आपल्या सोबत आहेत असे महाराजांनी यावेळी सांगितले.

सदर कार्यक्रम प्रसंगी हभप. वसंत महाराज भाकरे, हभप. शिवाजी महाराज ठाकरे, हभप. गोवर्धन महाराज, गोरक्षनाथ गलांडे, प्रकाश गायकवाड, रोहित महाराज, निलेश महाराज, चैतन्य मलिक आदींनी केली तर महाप्रसादाचे आयोजन बाबासाहेब खिल्लारे यांनी केली होते. यावेळी कान्हेगाव, भोजडे, वारी व परिसरातून मोठ्या प्रमाणावर भाविक उपस्थित होते.

# बोर्डाच्या परीक्षेवर भवितव्य ठरत नसून, जीवनात अनेक परीक्षांना सामोरे जावे लागते

## रोहित रामदिन | पद्मशाली स्नेहिता संघमच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

**अ. नगर | वीरभूमी –** फक्त बोर्डाच्या परीक्षेवर भवितव्य ठरत नाही, जीवनात अनेक परीक्षांना सामोरे जावे लागते. नियोजन व प्रयत्न केल्याशिवाय जीवनात यश मिळत नाही. अभ्यासात सातत्य, आत्मविश्वास, नियमितपणा व ध्येयपूर्तीची जिद्द ठेवून अतिउच्च शिखर गाठू शकता, असे प्रतिपादन सायन्स अकॅडमीचे संचालक रोहित रामदिन यांनी केले.

पद्मशाली स्नेहिता संघमच्या वतीने इयत्ता दहावी व बारावी बोर्डातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. शहरातील हॉटेल रेडियन्स येथे झालेल्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून रामदिन बोलत होते. याप्रसंगी शहर बँकेचे संचालक दत्तात्रय रासकोंडा, सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश गोंटला, पद्मशाली स्नेहिता संघमच्या अध्यक्षा डॉ. रत्ना बल्लाळ आदींसह पदाधिकारी महिला, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश गोंडला यांनी आपल्या आवडीच्या क्षेत्रात करियर केल्यास काम करण्यास उत्साह निर्माण होवून समाधान मिळते. पोलीस खाते एक कठीण करियर आहे. पण त्याद्वारे लोकांची सेवा करण्याचे समाधान मिळते. आवडीच्या क्षेत्रात उच्च पदावर जाण्याचा निश्चय करा. पोलीस खात्यात येण्याची इच्छा असलेल्या युवक-युवतींना मार्गदर्शन करण्याचे त्यांनी आश्वासन दिले.

दत्तात्रय रासकोंडा यांनी महिलांच्या वतीने दरवर्षी विद्यार्थ्यांचा होणारा सन्मान त्यांच्या भावी वाटचालीसाठी स्फूर्ती देणारा असल्याचे सांगून, पद्मशाली स्नेहिता संघमच्या माध्यमातून महिलांचे सुरु असलेल्या सामाजिक कार्याचे त्यांनी कौतुक केले. प्रास्ताविकात डॉ. रत्ना बल्लाळ यांनी मागील २४ वर्षापासून गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करुन त्यांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. यामध्ये कधीही खंड पडलेला नसल्याचे स्पष्ट करुन महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाची माहिती दिली.

पाहुण्यांचा परिचय सपना छिंदम, रोहिणी पागा, पूनम वन्नम यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साधना कोल्पेक यांनी केले. आभार सविता कोटा यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सविता एक्कलदेवी, सीमा अंकाराम, आरती छिंदम, निता बुरा,



पूजा म्याना, रेखा वड्डेपल्ली, सुवर्णा पुलगम, सोनी लयचेट्टी, विजया धारा, विजया गुंडू, रेखा गुरुड, सुमन श्रीगादी, कविता भारताल, प्रमिला चिलका, सीए सुनंदा रच्चा, कांचन कुंटला यांनी परिश्रम घेतले.